RNI No. MAHBIL/2009/31748

Reg. No. MCS/174/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ५५] सोमवार, सप्टेंबर २६, २०१६/आश्विन ४, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : २६.००

**असाधारण क्रमांक ८४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

## नगरविकास विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ सप्टेंबर २०१६

## अधिसूचना

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक पनप.२९१४/व्हीआयपी.सं.क्र.३०१/प्र.क्र.३५४/नवि-२३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) याच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ड) तसेच त्याच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार काढण्यात आलेली, शासकीय उद्घोषणा नगरविकास विभाग क्र. पनप. २९१४/व्हीआयपी.सं.क्र.३०१/प्र.क्र.३५४/नवि-२३, दिनांक १६ मे, २०१६ (**महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग-एक अ, मध्ये उप-विभाग, दिनांक १६ मे २०१६ रोजी प्रसिद्ध ) याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, ज्यासाठी पनवेल नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे, त्या रायगड जिल्ह्यातील पनवेल लहान नागरी क्षेत्र, हे लहान नागरी क्षेत्र राहणार नाही असे घोषित करण्याच्या उद्देशाने, उक्त कलम ६ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ड) अन्वये अधिसूचना काढण्याच्या आपल्या प्रस्तावावर हरकती व सूचना मागविल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (२) तसेच कलम ३ च्या पोट-कलम (२) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, उक्त उद्घोषणा दैनिक लोकमत, दैनिक पुढारी, दैनिक सकाळ, दैनिक कर्नाळा आणि दैनिक रामप्रहर या स्थानिक वर्तमानपत्रात देखील प्रसिद्ध केली होती. तसेच जिल्हाधिकारी, रायगड; तहसीलदार पनवेल आणि पनवेल नगरपरिषदेच्या कार्यालयांच्या सूचना फलकांवर देखील लावण्यात आली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त उद्घोषणेनुसार त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधी दरम्यान प्राप्त झालेल्या हरकती आणि सूचना शासनाने विचारात घेतल्या होत्या;

आणि ज्याअर्थी, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी देखील दिनांक १६ जुलै, २०१६ रोजी त्यांच्याकडे उपस्थित राहिलेल्या व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली आहे;

आणि ज्याअर्थी, विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांचा अहवाल आणि अशाप्रकारे प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन, महाराष्ट्र शासनाचे असे मत बनले आहे की, सदर हरकती व सूचना ह्या पुरेशा किंवा वैध नाहीत ;

## नगरविकास विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ सप्टेंबर २०१६

## अधिसूचना

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक पनप.२९१४/व्हीआयपी सं.क्र.३०१/प्र.क्र.३५४/नवि-२३.—ज्याअर्थी, २०१६ ला **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग एक-अ, असाधारण मध्य उप-विभाग यामध्ये प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग क्र.पनप.२९१४/व्हीआयपी. सं.क्र.३०१/प्र.क्र.३५४/नवि-२३, दिनांक १६ मे २०१६ याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, ज्याकरिता पनवेल शहर महानगरपालिका घटीत करण्यात येईल ते पनवेल अधिक मोठे नागरी क्षेत्र विनिर्दिष्ट करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या (१९४९ चा ५९) (यात यापुढे ज्याचा निर्देश) "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) कलम ३ च्या पोट-कलम (४) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना काढण्याचा आपला उद्देश जाहीर केला होता;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेत नमूद केलेल्या कालावधीत उक्त अधिसूचनेनुसार प्राप्त झालेल्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेले घटक लक्षात घेता, ज्याकरिता पनवेल शहर महानगरपालिका घटित करावयाची आहे ते पनवेलचे अधिक मोठे नागरी क्षेत्र विनिर्दिष्ट करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) आणि पोट-कलम (२अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पनवेल नगर परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, पूर्व प्रसिद्धीनंतर, दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ पासून संपूर्ण पनवेल नगरपरिषद लहान नागरी क्षेत्र व यासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली क्षेत्रे ही, अधिक मोठे नागरी क्षेत्र असेल आणि अशा अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी पनवेल शहर महानगरपालिका या नावाने ओळखली जाणारी एक महानगरपालिका असेल असे विनिर्दिष्ट करीत आहे.

## अनुसूची

ज्या क्षेत्रांचे पनवेल अधिक मोठे नागरी क्षेत्र बनेल आणि पनवेल शहर महानगरपालिका या नावाने ओळखली जाणारी एक महानगरपालिका असणारे शहर बनेल त्या क्षेत्रांचे वर्णन.

**नगरपालिका**-पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र

**महसुली गावे** - खालील महसुली गावांचे संपूर्ण क्षेत्र :—

(१) तळोजे पाचनंद (२) काळुंद्रे (३) खारघर (४) ओवे (५) देविचापाडा (६) कामोठे (७) चाळ (८) नावडे (९) तोंढरे (१०) पेंधर (११) कळंबोली (१२) रोडपाली (१३) खिडूकपाडा (१४) पडघे (१५) वळवली (१६) पाले खुर्द (१७) टेंभोडे (१८) आसुडगाव (१९) बिड (२०) आडिवली (२१) रोहिंजण (२२) धानसर (२३) पिसार्वे (२४) तुर्भे (२५) करवले बुद्रुक (२६) नागझरी (२७) तळोजे मजकुर (२८) घोट (२९) कोयनावेळे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सुधाकर शिंदे,**
शासनाचे उप सचिव.

आणि ज्याअर्थी, विद्यमान पनवेल नगरपरिषदेत आणि २९ गावांमध्ये समाविष्ट असलेले क्षेत्र हे अधिक मोठे नागरी क्षेत्र असेल आणि त्या प्रयोजनार्थ, ज्याकरिता पनवेल नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे, त्या रायगड जिल्ह्यातील पनवेल लहान नागरी क्षेत्र, हे लहान नागरी क्षेत्र राहणार नाही, असे घोषित करणे इष्ट आहे असे वाटते ;

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) द्वारे प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, या अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ पासून लहान नागरी क्षेत्र राहणार नाही असे, याद्वारे घोषित करीत आहे.

**अनुसूची**

**पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सुधाकर शिंदे,**
शासनाचे उप सचिव.